# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७८ वी बैठक दिनांक २७ ऑगस्ट २०१३

**ठराव**

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७८ वी बैठक दि. २७ ऑगस्ट २०१३ रोजी विधानभवनातील समिती सभागृह ७११, सातवा मजला,विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

१. मा. ना. शशिकांत शिंदे ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष

२. मा. श्रीमती मालिनी शंकर ... प्रधान सचिव (जव्य व लावि) व सदस्य

३. इं. शि. मा. उपासे ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**विशेष निमंत्रित**

१. मा. श्री. आनंदराव पाटील ... मा. उपाध्यक्ष

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्रीमती अे.अे. साळवी ... प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. च. आ. बिराजदार ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे

२. इं. अविनाश सुर्वे ... मुख्य अभियंता (जसं), पुणे

३. श्री. अजित मोरे ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ)

४. इं. राजन शहा ... अधीक्षक अभियंता (महामंडळ)

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. शि. मा. उपासे)** | **(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७८ वी बैठक दिनांक २७ ऑगस्ट २०१३

### ठराव

**ठराव क्रमांक ७८/१**

**"नियामक मंडळाच्या ७६ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"**

**ठराव क्रमांक ७८/२**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७७ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत"**

**ठराव क्रमांक ७८/३**

**"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत परिशिष्ट-३ मध्ये नमूद विविध १०१ पाणी वापर संस्थांना कार्यालयीन इमारतीसाठी पाटबंधारे खात्याकडील उपलब्ध ०.०२ हेक्टर जागा/इमारती शासन निर्णय दि. २७-०५-२००८ मधील तरतूदी नुसार ५० वर्षासाठी प्रतिवर्ष रु. १०/- या नाममात्र दराने भाडेपट्टयाने देणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्रमांक ७८/४**

**याबाबत बैठकीत ठराव करण्यात आला नाही. मात्र याबाबत सविस्तर चर्चा झाली व खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.**

**१. अशाप्रकारे निर्णय घेतल्यास महामंडळास किती व कोठे कर भरावा लागेल याची माहिती संकलीत करावी.**

**२. इतर सिंचन विकास महामंडळामध्ये काय पद्धत आहे याची माहिती घ्यावी.**

**३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी याबाबत पत्र दिले आहे. त्या अनुषंगाने खुलासा करण्यात यावा.**

**वरील माहितीसह प्रस्तुत ठराव पुन्हा नियामक मंडळासमोर सादर करावा.**

**ठराव क्रमांक ७८/५**

**"ठराव करण्यात येतो की, मे. सतीश नागरे अँड असो. सनदी लेखापाल, मुंबई यांचा अनुभव व कामातील निपुणता लक्षात घेता त्यांची महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०१३-१४ व सन २०१४-१५ चे लेखे संकलन व एकत्रीकरण करण्यासाठी अनुक्रमे रु.६ लक्ष व रु.६.६० लक्ष अधीक सेवाकर या दराने नेमणूक करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"**

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. शशिकांत शिंदे) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७८ वी बैठक दिनांक २७ ऑगस्ट २०१३

**ठराव क्रमांक ७८/६**

**"ठराव करण्यात येतो की, जलसंपदा खात्याच्या अखत्यारीतील जमिनीवर जाहिरातीसाठी नियामक मंडळाने ठराव क्र.४२/६ अन्वये मंजूर केलेले भाडेपट्टयाचे दर रद्द करुन त्या ऐवजी नोटीस बोर्ड लावण्यासाठी शासनाचे प्रचलित दर वापरण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"**

**ठराव क्रमांक ७८/७**

**"ठराव करण्यात येतो की, शासनाने पुणे महानगरपालिकेला भामा आसखेड धरणातून एकूण ७५.६७ दलघमी पाणी दिनांक ७/१२/२०११ व दिनांक १६/२/२०१३ च्या निर्णयानुसार मंजूर केलेले आहे. त्या अनुषंगाने भामा आसखेड धरणा जवळील मौजे वाकी तर्फे वाडा येथील गट नं.३१ मधील ०.२८ हे. व गट नं.३३ मधील ०.०२ हे. अशी एकूण ०.३० हेक्टर जमीन पुणे महानगरपालिकेस पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी शासनाचे प्रचलित दराने खालील अटींचे अधिन राहून भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**अट-१ : सदर जागा महामंडळाच्या मालकीची असल्याने, त्यावर इतर कोणतेही अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी पुणे महानगरपालिकेची राहील.**

**अट-२ : सदर जागेवर पुणे महानगरपालिकेचा मालकी हक्क राहणार नाही**

**अट-३ : प्रस्तावित जॅकवेल, पंपहाऊस व पोहोच पुलाचे बांधकाम करताना काम करणारे त्यावरील ठेकेदार, मजूर यांची तसेच भविष्यात वेळोवेळी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची ओळखपत्रासहीत माहिती जलसंपदा खात्यास देणे बंधनकारक राहील.**

**अट-४ : सदर जागेकरिता शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे पुणे महानगरपालिकेने महामंडळास भाडे देणे बंधनकारक राहील.**

**अट-५ : महापालिकेने सदर जागेचा वापर कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी करु नये."**

**ठराव क्रमांक ७८/८**

**"ठराव करण्यात येतो की, ॲड श्री. ज्ञा.द. शिंदे, हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे 'कायदे सल्लागार' आहेत. त्यांच्या या नियुक्तीस हयापूर्वी मंजूर केलेले मानधन, प्रवास,भत्ता दैनिंक भत्ता व इतर अटी व शर्तीनुसार दि. ०१.०९.१३ ते ३१.८.१४ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. शशिकांत शिंदे) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७८ वी बैठक दिनांक २७ ऑगस्ट २०१३

**ठराव क्रमांक ७८/९**

**“ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ कार्यालयासाठी १८ संगणक व ३ प्रिंटर्स तसेच विशेष चौकशी समिती कार्यालयासाठी २ संगणक प्रिंटर्ससह असे एकूण २० संगणक व ५ प्रिंटर्स खरेदी करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”**

**मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय :**

**ठराव क्रमांक ७८/१०**

**“ठराव करण्यात येतो की, भीमा सिना बोगद्याच्या कामाची निविदा क्र.ब-१/१७१ सन १९९७-९८ या बाबत ठेकेदार श्री. बी. टी. पाटील कन्स्ट्रक्शन व स्वप्नाली कन्स्ट्रक्शन संयुक्त अभियान मार्फत उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रुपये २५०० कोटीच्या मागण्यांसाठी लवाद नेमण्याबाबत केलेला अर्ज ११७/२०१३ यामध्ये महामंडळाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी ॲड श्री. रविन्द्र कदम यांची स्पेशल काऊन्सीलर म्हणून प्रत्येक सुनावणीच्या हजर दिनांकास रुपये २.०० लाख व प्रत्येक बैठकीस रुपये ५०,०००/- या विधीशुल्कासह नेमणूक करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

**सही/-**
**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**